# नॅक मूल्यांकनात महाराष्ट्र आघाडीवर

**नाशिक :** नॅकद्वारे होणारी प्रक्रिया ही केवळ महाविद्यालयांच्या तपासणीसाठी नसून गुणवत्ता वाढीसाठीही सहायक आहे. गेल्या दशकात या प्रक्रियेत अनेक सुधारणा करण्यात येत असून यांतून अधिकाधिक महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनात सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन राष्ट्रीय मूल्यांकन मान्यता परिषद (नॅक) बंगळुरूचे सल्लागार प्रा. डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केले. नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया करून घेणाऱ्या राज्यांत महाराष्ट्र देशात अग्रेसर असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

डॉ. पाटील यांनी के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाला भेट दिली. यानिमित्ताने महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी 'उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी बेंचमार्किंग' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, संगणक विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे उपस्थित होते.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# मोहगावी के. के. वाघ अभियांत्रिकीचे सेवा योजना शिबिर



मोहगाव । येथे के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण संस्थेचे राष्ट्रीय सेवा योजनेचे दि. १ ते दि. १५ या दिवसांमध्ये निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन नमामि गोदा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. स्वानंद डोंगरे, प्रा. स्नेहल चौधरी, प्रा. रोहित भास्कर, सरपंच भाग्यश्री टिळे, उपसरपंच आकाश लगड, ग्रामपंचायत सदस्य योगेश टिळे, ललिता टिळे, ग्रामसेवक ज्ञानेश्वर भोर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजेश पांडे यांनी नदी संवर्धनासाठी केलेले कार्य या संदर्भात अभ्यासपूर्ण असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व नदी संवर्धनासाठी प्रत्येकाने घ्यावयाची काळजी हे विद्यार्थ्यांना समजून सांगितले. प्रा. नांदूरकर यांनी शिबिरासंदर्भात महत्त्व पटवून सांगितले. विद्यार्थ्यांची राहण्याची सोय ग्रामपंचायतीकडून करण्यात आली होती. शिबिरा दरम्यान विद्यार्थ्यांनी श्रमदान, परिसर स्वच्छता, परिसरातील ग्रामस्थांच्या भेटी, पाणी परीक्षण, माती परीक्षण अशा विविध विषयांवर प्रबोधन केले. लिंगभेद, संवेदनशीलता, जीवनजागृती, नदी स्वच्छता, जलस्रोत स्वच्छता, वृक्षारोपण, लोकशाहीतील सहभाग, मतदान जागृती, मंदिर स्वच्छता, अपारंपारिक ऊर्जा, अक्षय ऊर्जा, मृदा संवर्धन अशा अनेक विषयांवर पथनाट्य करून गावातील लोकांना त्याचे महत्त्व पटवून दिले. यादरम्यान विद्यार्थ्यांनी गावातील लहान मुलांसाठी शैक्षणिक बोलक्या भिंती तयार केल्या त्यामध्ये ABCD, १, २, ३, अ आ इ, हप्त्यातील वार, अशा अनेक प्रकारच्या भिंतीवर चित्रीकरण करण्यात आले. शिबिराच्या दिनचर्यामध्ये दुसऱ्या सत्रात वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यात्यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. महाराष्ट्रातील नामांकित सर्पमित्र सचिन गिरी यांनी सर्पांची ओळख करून देत सर्पदंश याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले. स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचे अधिकारी सिसोदिया यांनी वित्तीय साक्षरता याबद्दल गावातील शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. सचिन म्हासणे यांनी ध्यानधारणा व मन:शांती सत्संग केले. स्नेहल नाईक यांनी सामाजिक विकास याबद्दल मार्गदर्शन केले. अश्विनी देशपांडे यांनी महिला सबलीकरण यावर मार्गदर्शन केले. शिबिराच्या सहाव्या दिवशी जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य निदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. गावातील ८० लोकांनी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला तर ते ३० लोकांनी रक्तदान केले. यावेळी आरोग्य विभागाचे नाशिक विभागीय सहाय्यक संचालक डॉ. पी. डी. गांडळ व नाशिक विभागीय संदर्भसेवा रुग्णालयाचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पुरी यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रक्तदात्यांचे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. शिबिराच्या समारोप प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार मुकुंद पिंगळे यांनी शेतीविषयक व जैविक शेती यावर मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली. यावेळी रासेयो प्रा. स्वानंद डोंगरे, सरपंच भाग्यश्री टिळे, उपसरपंच आकाश लगड, ग्रामपंचायत सदस्य योगेश टिळे, सुरेखा टिळे, ललित टिळे, ग्रामसेवक ज्ञानेश्वर भोर, माजी विद्यार्थी ऋषिकेश उंडे, प्रा. रोहित भास्कर, शिक्षक वृंद, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वृक्षारोपण करून करण्यात आली.

सर्व्हिसेस - कन्सल्टन्सी

सौ. जयश्री अरविंद राठी
दैनिक आपलं महानगरसह सर्व वर्तमान पत्रासाठी सर्व प्रकारच्या जाहिराती स्वीकारण्याचे केंद्र
बालवाडी शिक्षिका कोर्स
L.I.C. Agent | प्लॉट अँण्ड लॅन्ड कन्सल्टंट
पत्ता : पहिला मजला, मनोरम आर्केड, वकीलवाडी, नाशिक
9423967392, 9423177760



# के के वाघ मध्ये ई-कचरा संकलन मोहीम

**नाशिक :** कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया (सी एस आय) नाशिक चॅप्टर. पूर्णम इकोव्हिजन पुणे आणि पर्यावरण संरक्षण गतिविधी यांच्या संयुक्त विद्यमाने ई-कचरा संकलन मोहीम राबविण्यात आली. महानगरपालिकेचे आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांचे हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी ई-कचरा स्वीकारण्यासाठी औद्योगिक संस्था, शैक्षणिक संस्था, रहिवासी सोसायटी मिळून जवळपास ८० संकलन केंद्रांची नोंदणी करत व्यवस्था करण्यात आली. त्यात प्रामुख्याने के के वाघ अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय येथील संकलन केंद्राने उल्लेखनीय भूमिका बजावली. आजच्या टेक्नो-सॅव्ही जगात, इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रिकल आणि स्मार्ट गॅझेट्सचा वापर आणि खप प्रचंड प्रमाणात वाढला असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रॉनिक वेस्ट अर्थात ई-कचरा निर्माण होत आहे. मात्र, पर्यावरणपूरक पद्धतीने याचे विघटन होत नसल्याने त्याचे विविध दुष्परिणाम जाणवतात.त्यामुळे वर्तमान आणि येणाऱ्या पिढीलाही ई-कचऱ्याचे व्यवस्थापन, जागरूकता व पर्यावरण संरक्षणार्थ ई- कच-याचे निर्मूलनासाठी आवश्यक आहे. संगणक विभागप्रमुख प्रा.डॉ.शिरीष साने यांच्या मार्गदर्शनाखाली व ई-कचरा संकलन मोहीमेच्या मुख्य समन्वयक प्रा.डॉ.रुपाली कुलकर्णी यांच्या सहकार्याने के के वाघ, सी एस आय स्टुडंट चॅप्टर व प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. प्रा. डॉ.योगिता भिसे व प्रा.प्रिया रकिबे यांनी विशेष प्रयत्न केले. मोहीम यशस्वीरीत्या झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस बंदी, प्राचार्य डॉ.के. एन. नांदुरकर यांनी अभिनंदन केले.

देशदूत

# वाघ महाविद्यालयात इ-कचरा संकलन

नाशिक | दि. २१ प्रतिनिधी

कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया (सीएसआय) नाशिक शाखा, पूर्णम इकोव्हिजन पुणे आणि पर्यावरण संरक्षण गतिविधी यांच्या संयुक्त विद्यमाने के.के. वाघ महाविद्यालयात इ-कचरा संकलन मोहीम राबविण्यात आली. नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांचे हस्ते मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. ई-कचरा स्वीकारण्यासाठी ८० संकलन केंद्रांची नोंदणी करण्यात आली. सध्या इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रिकल आणि स्मार्ट गॅझेट्सचा वापर आणि खप प्रचंड प्रमाणात वाढला असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रॉनिक वेस्ट अर्थात इ-कचरा निर्माण होत आहे. मात्र पर्यावरणपूरक पद्धतीने याचे विघटन होत नसल्याने त्याचे विविध दुष्परिणाम जाणवतात. त्यामुळे वर्तमान आणि येणाऱ्या पिढीलाही इ-कचऱ्याचे व्यवस्थापन, जागरूकता व पर्यावरण संरक्षणार्थ इ-कचरा निर्मूलन आवश्यक आहे. संगणक विभागप्रमुख प्रा.डॉ.शिरीष साने यांच्या मार्गदर्शनाखाली व



मोहिमेच्या मुख्य समन्वयक प्रा.डॉ.रुपाली कुलकर्णी यांच्या सहकार्याने के. के वाघ, सीएसआय शाखा व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. प्रा. डॉ. योगिता भिसे व प्रा.प्रिया रकिबे यांनी विशेष प्रयत्न केले.

[redacted]

Deshdoot Edition
Feb 22, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

आपलं महानगर | my महानगर .com
www.mymahanagar.com

# वाघ इंजिनिअरिंगमध्ये २८ बॉक्स ई-कचरा संकलन



नाशिक । शहरात कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया (सी. एस. आय.) नाशिक चॅप्टर पूर्णम इकोव्हिजन पुणे आणि पर्यावरण संरक्षण गतिविधी यांच्या संयुक्त विद्यमाने ई-यंत्रणा श्री ई-कचरा संकलन मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचे नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. के. के. वाघ अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालयात २८ बॉक्सचे ई-कचरा संकलन करण्यात आले. यामध्ये जुने टीव्ही, लॅपटॉप, मोबाईलचा समावेश आहे.

यावेळी ई-कचरा स्वीकारण्यासाठी औद्योगिक संस्था, शैक्षणिक संस्था, रहिवासी सोसायटी मिळून जवळपास ८० संकलन केंद्रांची नोंदणी करत व्यवस्था करण्यात आली. त्यात प्रामुख्याने के. के. वाघ अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय येथील संकलन केंद्राने उल्लेखनीय भूमिका बजावली. संगणक विभागप्रमुख प्रा.डॉ.शिरीष साने यांच्या मार्गदर्शनाखाली व ई-कचरा संकलन मोहिमेच्या मुख्य समन्वयक प्रा.डॉ.रुपाली कुलकर्णी यांच्या सहकार्याने के के वाघ, सी एस आय स्टुडन्ट चॅप्टर व प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. प्रा. डॉ.योगिता भिसे व प्रा.प्रिया रकिबे यांनी विशेष प्रयत्न केले. मोहीम यशस्वीरित्या संपन्न झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.समीर वाघ, सर्व विश्वस्त, सचिव प्रा. के. एस बंदी, प्राचार्य डॉ.के. एन. नांदुरकर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचे अभिनंदन केले.

AaplaMahanagar Edition
Feb 23, 2023 Page No. 10
Powered by : eReleGo.com

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# परदेशी दाम्पत्याची मोटरवाहन निरीक्षकपदी निवड

**नाशिक ।** लिना परदेशी आणि त्यांचे पती निरंजन परदेशी या दोघांची मोटरवाहन निरीक्षकपदी निवड झाली आहे. त्यानिमित्त त्यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.





लिना परदेशी यांनी नाशिकमधील केटीएचएम महाविद्यालयातून बारावी विज्ञान केल्यानंतर के. के. वाघ इंजिनिअरिंगमध्ये एमई. डी. पदव्युत्तर पदवी घेतली. त्यांचे वडील के. टी. एच. एम मध्ये सेवेला होते. निरंजन परदेशी यांनी नांदेड येथे मेकॅनिकल इंजिनअरिंगमधून एमटेक केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २०२१ मध्ये घेतलेल्या परीक्षेत लिना परदेशी या खुल्या प्रवर्गात राज्यात पाचव्या तर त्यांचे पती निरंजन परदेशी हे इतर मागास प्रवर्गात चौदाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १३ फेब्रुवारी २०२३ रोजी दोघेही श्रीरामपूर येथे प्रादेशिक परिवहन कार्यालयात प्रशासकीय सेवेत रुजू झाले. मविप्रचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनिल ढिकले, सभापती बाळासाहेब क्षिरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड आदींनी या दाम्पत्याचे अभिनंदन केले आहे.

AaplaMahanagar Edition
Feb 23, 2023 Page No. 10
Powered by : eReleGo.com

पुढारी

# 'के. के. वाघ'मध्ये कार्यशाळा उत्साहात

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

अध्यापन प्रभावी होण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणातील रुची निर्माण करण्यासाठी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या योगदानाची नवीन शैक्षणिक धोरणातही मोठी गरज भासणार आहे, असे प्रतिपादन टिळक महाराष्ट्र विद्यपीठाचे माजी कुलपती डॉ. एस. जी. बापट यांनी केले.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय व इंडियन सोसायटी ऑफ ट्रेनिंग अँण्ड डेव्हलपमेंट यांच्या दोनदिवसीय नवीन शैक्षणिक धोरणाविषयी कार्यशाळेत ते बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रीय अध्यक्षा अनिता चौहान, अशोक देशपांडे, डॉ. डी. के. चोपडे, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर आदींसह विभागप्रमुख होते.

अनिता चौहान यांनी 'जीवनात यशस्वी होण्याची सूत्रे' याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी आयएसटीडी नाशिक शाखेच्या वेबसाइटचे तसेच ई-बुलेटीनचे अनावरण झाले. तसेच संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांनी समाजातील विविध स्तरातील सामाजिक सेवेत सक्रिय सहभाग नोंदवणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव केला. स्वाती पवार व अनिता व्यास यांनी सूत्रसंचालन केले.

My Nashik Edition
Feb 25, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in



नाशिक : वाघ अभियांनत्रिकी महाविद्यालयात लोगो मास्टर स्पर्धेतील विजेत्यांना गौरविताना प्राचार्य डॉ. एस. के. नांदूरकर. शेजारी डॉ. डी. एम. चांदवडकर, प्रा. एस. आर. बाजी.

# के. के. वाघ अभियांत्रिकीत 'लोगो मास्टर' स्पर्धा उत्साहात

नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन संस्था करिअर कट्टा उपक्रमांतर्गत पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन सबमिशन मोड स्वरूपात 'लोगो मास्टर स्पर्धा - २०२२' स्पर्धा आयोजित केली गेली होती. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ नुकताच पार पडला. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक सिव्हिल विभागाचा यश खंडेराव पाटील, द्वितीय मेकॅनिकल विभागाचा यशोधन संतोष नाडनकर, तर तृतीय पारितोषिक कॉम्प्युटर विभागाचा नमन वर्मा यांना देण्यात आले. तसेच ई अँन्ड टीसी विभागाचे तन्मय गजकल, गौरी चौधरी व गायत्री पगार आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाचा सुमीत देशमुख यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर आणि इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. करिअर कट्टा समन्वयक, प्रा. सीमा बाजी आणि करिअर कट्टा- विद्यार्थी ब्रँड ॲम्बेसिडर युगा भामरे व विजय जाधव यांनी परिश्रम घेतले. ५० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवला. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. नांदुरकर यांनी स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# बोधचिन्ह स्पर्धेत ५० विद्यार्थ्यांची कलाकृती

## पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी करिअर कट्टा, प्रथम पारितोषिक के. के. वाघ कॉलेजच्या यश पाटीलला

प्रतिनिधी | नाशिक

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांमधील नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी करिअर कट्टा उपक्रमातंर्गत ऑनलाइन बोधचिन्ह स्पर्धा झाली. यात ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

प्रथम पारितोषिक के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल विभागाचा विद्यार्थी यश पाटील याने पटकावला. तर द्वितीय क्रमांक यशोधन नाडणकर, तृतीय क्रमांक नयम वर्मा यांना प्राप्त झाला. तन्मय गजकल, गौरी चौधरी, गायत्री पगार व सुमित देशमुख या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन बक्षिसे देण्यात आली. के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन संस्था आणि नाशिकच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत ही अनोखी स्पर्धा झाली.



बोधचिन्ह स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. यात यश पाटील याला गौरविताना मान्यवर.

प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर आणि इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. करिअर कट्टा समन्वयक, प्रा. सीमा बाजी आणि करियर कट्टा उपक्रमाचे विद्यार्थी ब्रँड ॲम्बेसेडर युगा भामरे व विजय जाधव यांनी परिश्रम घेतले.

पुढारी



नाशिक : लोगो मास्टर स्पर्धा २०२२ बक्षीस वितरण करताना प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. डी. एम. चांदवडकर व प्रा. एस. आर. बाजी.

# लोगो स्पर्धेत यश पाटील प्रथम

**नाशिक :** के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन संस्थेत 'लोगो मास्टर स्पर्धा- २०२२' स्पर्धेचे प्रथम पारितोषिक सिव्हिल विभागाचा यश पाटील, द्वितीय मेकॅनिकल विभागाचा यशोधन नाडणकर, तर तृतीय पारितोषिक कॉम्प्युटर विभागाचा नमन वर्मा यांनी पटकाविले. तसेच ई अॅण्ड टीसी विभागाचे तन्मय गजकल, गौरी चौधरी व गायत्री पगार आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाचा सुमित देशमुख यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. 'करिअर कट्टा - विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी' हा स्पर्धेचा विषय होता. करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांना समजावा व त्याचबरोबर, या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना पर्यंत पोहोचवणे या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केले गेले. ५० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवला. विजेत्यांना प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर आणि इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. करिअर कट्टा समन्वयक, प्रा. सीमा बाजी आणि करिअर कट्टा- विद्यार्थी ब्रॅण्ड अॅम्बेसेडर युगा भामरे व विजय जाधव यांनी परिश्रम घेतले.

Nashik Edition
Feb 9, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# के. के. वाघमध्ये लोगो मास्टर स्पर्धा उत्साहात

## ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदवला सहभाग

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन संस्था, नाशिकच्या करिअर कट्टा उपक्रामांतर्गत अभ्यासक्रमा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या क्रिया कल्पनांना वाव मिळावा या हेतुने पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन सबमिशन मोड स्वरुपात लोगो मास्टर स्पर्धा - २०२२ ही स्पर्धा आयोजित केली गेली होती. या स्पर्धेचा नुकताच बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक सिव्हिल विभागाचा यश खंडेराव पाटील, द्वितीय मेकॅनिकल विभागाचा यशोधन संतोष नाडणकर तर तृतीय पारितोषिक कॉम्प्युटर विभागाचा नमन वर्मा यांना देण्यात आले. तसेच ई ॲण्ड टी सी विभागाचे तन्मय गजकल, गौरी चौधरी व गायत्री पगार आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाचा सुमित देशमुख यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला. विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. करियर कट्टा समन्वयक, प्रा. सीमा बाजी आणि करियर कट्टा- विद्यार्थी ब्रँड म्बेसेडर युगा भामरे व विजय जाधव यांनी परिश्रम घेतले.करिअर कट्टा - विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा स्पर्धेचा विषय होता. करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांना समजावा व त्याच बरोबर, याअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना पर्यंत पोहचवणे ह्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केले गेले. ५० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सक्रीय सहभाग नोंदवला.संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के एस बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# के.के. वाघमध्ये लोगो मास्टर स्पर्धा उत्साहात

नाशिक- के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन संस्था, नाशिकच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत अभ्यासक्रमा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या क्रिया कल्पनांना वाव मिळावा या हेतुने पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन सबमिशन मोड स्वरुपात लोगो मास्टर स्पर्धा आयोजित केली गेली होती. या स्पर्धेचा नुकताच बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला.

स्पर्धेचे प्रथम पारितोषिक सिव्हिल विभागाचा यश खंडेराव पाटील, द्वितीय मेकॅनिकल विभागाचा यशोधन संतोष नाडणकर तर तृतीय पारितोषिक कॉम्प्युटर विभागाचा नम्न वर्मा यांना देण्यात आले. तसेच ई अँण्ड टी सी विभागाचे तन्मय गजकल, गौरी चौधरी व गायत्री पवार आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाचा सुमित देशमुख यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. डी. एम. चांदवडकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला. विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

AaplaMahanagar Edition
Feb 8, 2023 Page No. 12
Powered by : eReleGo.com

# डॉ. नांदुरकर यांना 'उत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार

नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव निळकंठ नांदुरकर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'उत्कृष्ट प्राचार्य' हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचे सहसचिव डॉ. बाळासाहेब रासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी व संगणक विभागप्रमुख डॉ. शिरीष साने उपस्थित होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे वतीने नुकतेच प्रसिद्धी पत्रकाद्वारे विविध पुरस्कारांची घोषणा केली गेली. पुणे विद्यापीठांतर्गत १३७ अभियांत्रिकी महाविद्यालय असून यातून प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांची 'उत्कृष्ट प्राचार्य' म्हणून निवड झालेली आहे. पुरस्कार वितरण समारंभ सोहळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थापना दिनानिमित्त म्हणजेच शुक्रवारी (ता. १०) पुणे येथे होणार आहे.

# डॉ. नांदुरकर यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार



**पंचवटी ।** के. के. शिक्षण संस्था संचलित के के वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचे सहसचिव डॉ. बाळासाहेब रासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी व संगणक विभागप्रमुख डॉ. शिरीष साने उपस्थित होते.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# प्राचार्य डॉ. केशव नांदुरकरांना पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार

नाशिक । के. के. शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव निळकंठ नांदुरकर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्याकडून उत्कृष्ट प्राचार्य हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण समारंभ सोहळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थापना दिनानिमित्त म्हणजेच शुक्रवारी (दि.१०) पुणे येथे होणार आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचे सहसचिव डॉ. बाळासाहेब रासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे वतीने नुकतेच प्रसिद्धी



पत्रकाद्वारे विविध पुरस्कारांची घोषणा केली गेली. पुणे विद्यापीठांतर्गत १३७ अभियांत्रिकी महाविद्यालय असून या मधून प्राचार्य डॉ. केशव निळकंठ नांदुरकर यांची उत्कृष्ट प्राचार्य म्हणून निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. नांदुरकर यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाने विविध पुरस्कार प्राप्त केले आहेत. याप्रसंगी संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी व संगणक विभागप्रमुख डॉ. शिरीष साने उपस्थित होते.

AaplaMahanagar Edition
Feb 2, 2023 Page No. 11
Powered by : eReleGo.com

## विश्वास पाटील : बाळासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमाला

# महाराष्ट्राचा इतिहास 'महासम्राट'मधून मांडायचाय

सकाळ वृत्तसेवा

[illegible]



थोरात सभागृह : के. के. वाघ शिक्षण संस्था आयोजित (कै.) बाळासाहेब देवराम वाघ यांच्या स्मृतिनिमित्त व्याख्यानमालेत मंगळवारी बोलताना ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील. समोर उपस्थित नागरिक.

[illegible]



### तरुणाईला इतिहास समजून घेण्याची गरज : डॉ. रत्नाकर

[illegible]

आपलं महानगर
www.mymahanagar.com
My महानगर.com

# शहाजी महाराजच शिवरायांचे पहिले गुरु

**नाशिक** । छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले गुरु शहाजी महाराजच आहेत. याचे पुरावे कर्नाटक सरकारने प्रसिद्ध केलेल्या गाईडमध्ये आहेत. शहाजी महाराजांनी तोफांचे इतर शिक्षण शिवरायांना दिले आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी केले.



के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था, नाशिकतर्फे बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंगळवारी (दि.३१) सायंकाळी ६ वाजता रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड येथे व्याख्यानमालेचे आयोजन करण्याचे आले आहे. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी मराठ्यांचा धगधगता इतिहास: महापिता शहाजी, महासम्राट शिवाजी या विषयावर गुंफले. सुरुवातीला बाळासाहेब वाघ यांच्या जीवनावर आधारित चित्रफित दाखवण्यात आली. यावेळी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय स्वाती पवार व समीर वाघ यांनी करुन दिला. डॉ. पी. बी. कुशारे यांनी आभार मानले.